ISSN: 2249-894X IMPACT FACTOR : 5.2331(UIF) VOLUME - 6 | ISSUE - 11 | AUGUST - 2017

REVIEW OF RESEARCH

# डॉ. संजय लांडगे यांचे समीक्षा लेखन



डॉ. वामन जाधव
मराठी विभाग , सहयोगी प्राध्यापक , मा. ह. महाडिक महाविद्यालय मोडनिंब.

## प्रस्तावना :

कथा, कविता आणि नाटक या क्षेत्रांत आपल्या कसदार साहित्य निर्मितीने डॉ. संजय संभाजी लांडगे यांनी एक वेगळी प्रतिमा निर्माण केली आहे. साहित्याच्या सर्व क्षेत्रांत संचार करणाऱ्या या लेखकाने विपुल लेखन केले आहे. 'सोलापूरच्या बंडखोर कविता' (प्रातिनिधीक कविता), 'वांझ क्रांती आणि तीन एकांकिका', 'आईची कविता', 'काळा गुलाब'(गझलसंग्रह), 'मायभूमी', 'मन वढाय वढाय' (कथासंग्रह), 'गाणे अनाम पक्ष्याचे' (नाटक), 'रेशीम अनुबंध' व 'प्रतिकार' या दोन लघु कादंबऱ्या यांद्वारा अनेक वाङ्मयप्रकार त्यांनी हाताळले आहेत.

नुकतेच त्यांचे 'संतकवी कबीर आणि तुकारामः एक चिंतन' आणि 'वसंत कानेटकरांचे नाटयवैभव' असे दोन समीक्षाग्रंथ प्रसिद्ध झाले आहेत. मुळातच ललित लेखन करणाऱ्या कलावंताची समीक्षा मार्मीक असते, अचूक असते. त्या त्या वाङ्मय प्रकाराची जाण आणि गरज याची त्याला चांगली कल्पना असते आणि त्यातून त्याची सिद्ध झालेली समीक्षा ही तंत्र आणि मंत्र यांचे कलात्मक भान ठेवून साकार झालेली असते. त्यामुळे ती कोरडी वा केवळ तांत्रिक वाटत नाही. समीक्षेसाठी स्वीकारलेल्या कलाकृतीला ती उचित न्याय देऊ शकते. द. ता. भोसले यांचे हे मत खरेच आहे. 'संतकवी कबीर आणि तुकाराम एक चिंतन' व 'वसंत कानेटकरांचे नाट्यवैभव' हे दोन समीक्षाग्रंथ वाचल्यावर ते सहज लक्षात येते.

'संतकवी कबीर आणि तुकाराम एक चिंतन'या समीक्षा ग्रंथाची विभागणी एकूण आठ प्रकरणांत केली आहे. 'संतकवी कबीर आणि तुकाराम यांचे जीवनचरित्र यावर लेखकाने पहिल्या प्रकरणात प्रकाश टाकला आहे, तर दुसऱ्या प्रकरणात 'संतकवी कबीर आणि तुकाराम कालीन सामाजिक, धार्मिक व राजकीय परिस्थितीचा आढावा घेतला आहे. प्रकरण तिसऱ्यामध्ये संत कबीर आणि संत तुकाराम यांच्या ग्रंथाविषयी विवेचन केले आहे. तर चौथ्या प्रकरणात संत कबीर आणि संत तुकाराम आध्यात्मिक तत्त्वज्ञान उलगडून दाखविले आहे. प्रकरण पाचमध्ये संत कबीर आणि संत तुकाराम यांच्या सामाजिक विचारधारांचे विश्लेषण केले आहे. प्रकरण सहामध्ये संत कबीर आणि संत तुकाराम यांच्या आध्यात्मिक कवितेचे भाषिक विशेष नोंदविले आहेत; संत कबीर आणि संत तुकाराम यांच्या कार्याचे मूल्य सांगितले आहे; तर शेवटच्या प्रकरणात लेखकाने काही महत्त्वपूर्ण निष्कर्ष काढले आहेत.

डॉ. संजय लांडगे यांचा पिंड कवीचा संवेदनशील हे त्यांचे पिंडगत वैशिष्ट्य आहे. त्यामुळे ते कवितेशी चट्कन एकरूप होतात. 'संतकवी कबीर आणि तुकाराम यांच्या काव्याशी ते असेच एकरूप झालेले दिसतात. विद्यार्थी म्हणून शिकत असतानाच 'संतकवी कबीर आणि तुकाराम' माझ्या आवडीचे विषय आहेत. हे त्यांनी मनोगतात सांगितले आहे.

संतकवी कबीर आणि तुकाराम यांची कविता त्यांनी मनापासून वाचली आहे, पचविली आहे, तटस्थपणे त्याचे अवलोकन केले आहे. त्यांच्या प्रदीर्घ चिंतनातूनच ह्या अनमोल ग्रंथाची निर्मिती झाली आहे. कोणतीही साहित्यकृती समजावून घेत असताना त्या साहित्यकृतीच्या समकालीन समाज जीवनाचा राजकीय, सांस्कृतिक, धार्मिक अशा सर्वच अंगांचा बारकाईने अभ्यास करावा लागतो. मग त्या काळात कलावंताने व्याकूळ होऊन मारलेली हाक कशी आहे, त्यावरच कविता कशी ठरते ते पाहता येते. मुळातच वेदनेला जाग आली म्हणजे शब्द बोलू लागतात. हे शब्द सामर्थ्यवान असतील तर अपार कारूण्याचे लेणे उठावदार दिसते. शब्द हेच कवीचे शस्त्र असते. ते माणसाला माणुसपण बहाल करते. त्याच्यामध्ये दया, प्रेम, करूणा निर्माण करते. दांभिकतेवर आसूड ओढत, ढोंग्यांचा बुरखा फाडत, समाजातील विषमतेवर तुटून पडत समताधिष्ठित समाज निर्माण करते. हे सर्व शब्दाच्या बळावर होत असते. असे शब्द मनात गर्दी करतात. बाहेर येण्यासाठी धडपडतात. ठसठसणाऱ्या वेदनांची पखाल कुठेतरी रिती करावी असे कलावंताला वाटते. मग तिमिराकडून तीर्थांकडे जाणारी वेदनेची संघर्षयात्रा अंधारबनातून झेपावते. अशी कविता कसदार असते. आशयसंपन्न असते. पडिक जमिनीवर पहिले पीक तरारून यावे अशी ती असते. कवीच्या अनुभव मुशीतून येणारी ही कविता वाचकाचे अनुभवविश्व समृद्ध करते. वाचकाला अस्वस्थ क रते. विचार करायला लावते. वाचकाच्या मनात रूतून बसते. ती काळाचा साक्षीदार बनते, काळाच्या कसोटीवर टिकून राहते, जगण्याला ऊर्जा पुरवते. संतकवी कबीर आणि तुकाराम यांच्या काव्याने गेली कित्येक वर्षे समाजाच्या जगण्याला बळ दिले आहे. त्यांच्या कवी म्हणून असलेल्या व्यक्तिमत्त्वाचे पैलू उलगडून दाखवत असताना जाणवणारी लेखकाची निरीक्षण शक्ती वाचकाला थक्क करून सोडते.

तुकारामांचे दोन विवाह झाले. पहिला विवाह वयाच्या १३ व्या वर्षी रूखमाईबरोबर झाला, परंतु ती दमेकरी असल्याने काही काळानंतर त्यांचा दुसरा विवाह त्यांच्या वडिलांनी करून दिला. दुसरी पत्नी जिजाबाई ऊर्फ आवली. तिला सहा अपत्ये झाली. संत कबीराचे सांसारिक जीवन अत्यंत कष्टात, दुःखात गेले. त्यांची पहिली पत्नी कुरूप आणि कुलक्षणी होती तर दुसरी पत्नी सुंदर, ज्ञानवती आणि सुलक्षणी होती. ज्या गरिबांना दोनवेळा पोटभर अन्न मिळत नाही ते कर्जाची परतफेड कसे करतील? ह्या विचाराने व्याकूळ होऊन तुकोबांनी कर्जदारांना कर्जमुक्त केले; तर कबीरांना भोजन, पैसे मिळाले तर ते आपल्या मुलांचा संसाराचा विचार न करता साधुसंतांनाच देऊन टाकत होते. त्यांची आणि संत तुकारामांची आंतरिक तळमळ एकच आहे. जातीव्यवस्था ही ईश्वर निर्मित नाही तर ती मानवनिर्मित आहे. याविषयी दोन महात्म्यांचे एकमत होते. दोघांचाही पुस्तकी ज्ञानावर विश्वास नव्हता. संत तुकाराम येणाऱ्या परिस्थितीला सामोरे जात, येणाऱ्या संकटाला पायाखाली घेत निर्भिडपणे संघर्ष करीत राहिले. वाट्याला आलेली अनेक दुःखे त्यांनी पिऊन टाकली होती. म्हणूनच तुकारामांचे काव्य कमालीचे आत्मपर वाटते. संत कबीर त्यांचेही असेच आहे. संत तुकारामांना मंबाजी बाबाने खूप छळले. रामेश्वर भटाने तुकोबांच्या अभंगांच्या वह्या इंद्रायणीत बुडविल्या; त्यांनी कवित्व करू नये, कोणास उपदेश करू नये अशी बंधने त्यांच्यावर घालण्यात आली. संत कबीरांना सिकंदर लोदीने शिक्षा केली. संत तुकारामांचे काव्य जीवंत राहिले तसे कबिराचेही काव्य जीवंत राहिले. संत तुकाराम अमर राहिले तसे कबीरही अमर राहिले. संत कबीर यांचा पिंड जसा क्रांतीकारी कवीचा होता, तसाच संत तुकारामांचाही पिंड क्रांतीकारी कवीचा होता. दोघेही भक्त, कवी व सुधारक म्हणून समाजात वावरत होते.

संत कबीरांनी कर्मकांडाला विरोध केला. ढोंगी, लबाड संन्याशांवर ताशेरे ओढले. तसे संत तुकारामांनीही कर्मकांडाला विरोध केला. संत कबीर यांच्या मृत्यूविषयी संशोधकांमध्ये बरीच मत–मतांतरे आहेत. तशीच संत तुकारामांच्या मृत्यूविषयी मत–मतांतरे आढळतात. दोन्ही संतांच्या निर्वाणानंतर कित्येक वर्षाचा काळ लोटून गेला तरीही दोन्ही संतांचे समाजजीवनातील स्थान अढळ आहे. संत कबीर काळात सामाजिक, धार्मिक, राजकीय परिस्थिती अस्थिर होती. कबीरांची कविता ही जशी मौखिक परंपरेतून आली तशी तुकारामांचीही कविता मौखिक परंपरेतून आली आहे. दोघांच्याही काव्यात परखडपणा, स्पष्टवक्तेपणा, निस्पृहपणा, सडेतोड वृत्ती दिसून येते. संत कबीराच्या भक्तीचे स्वरूप अत्यंत विशाल उदात्त आणि अनंत आहे. तसेच संत तुकारामांच्याही भक्तीचे स्वरूप आहे. दोघांचीही भक्ती सजग आणि डोळस आहे. कबीरांनी गुरूला मोठेपणा दिला आहे. तुकारामानेही गुरू हेच त्यांच्या जीवनाचे सर्वस्व असे मानले होते, हे अनेक उदाहरणांनी डॉ. लांडगे यांनी पटवून दिले आहे.

संत तुकारामाने सर्वसामान्याना जगण्याची व लढण्याची नवी दृष्टी दिली. तशीच कबीरानेही दिली. जन्मावर, जातीवर आणि वर्णावर माणसाचे कर्तृत्त्व कधीच अवलंबून असत नाही; तर ते गुणावर सद्‌गुणावर अवलंबून असते. याबाबतीत दोघांचे एकमत होते. संत कबीरांच्या व्यक्तिमत्त्वात समाजप्रबोधनाचा हेतू होता, तसाच संत तुकारामांचाही होता. तुकोबाच्या कवितेची सुरूवात ही स्वतःच्या घरापासून होते. तशीच संतकवी कबीर यांच्याही कवितेची सुरूवात घरापासूनच होते. अशी दोन्ही महात्म्यांच्या जन्मापासून ते मृत्यूंपर्यंत त्यांचे कौटुंबिक जीवन आणि त्यांचे काव्य, समाजप्रबोधनाचा हेतू, त्यांचे समांतर पातळीवरचे कार्य, यातील साम्य लेखकाने अचूकपणे नोंदविले आहे. लेखकाची या पाठीमागची सम्यकदृष्टी दिसून येते. संत कबीर आणि संत तुकाराम यांच्या भाषेविषयी लेखकाने मार्मीकपणे भाष्य केले आहे ते पाहाण्यासारखे आहे. ते म्हणतात, ''तुकोबा–कबीरांची कविता विविधरंगी, विविधढंगी जीवन भाष्यांनी नटली आहे. त्यांच्या वाणीत प्रासादिकता आहे. कारूण्य आहे. कोमलते सोबत कठोरता आहे. मनाचा आणि वाणीचा असा निधडेपणा इतरत्र क्वचित आढळेल. परखडपणा, सत्य, अहिंसकता तसाच बेडर बंडखोरपणाही या कवितेत अवतरला आहे. अनेक ठिकाणी त्यांच्या कवितेची भाषा तिखट बनते. ग्राम्यता हा तर या कवितेचा अलंकार आहे! त्यामुळेच तुकोबा–कबीरांच्या कवितेवर अनेकांनी ग्राम्यतेचा आरोप केला असला तरी तो फोल ठरतो, कारण ही ग्राम्यता कळवळ्यापोटी, सात्विक संतोषापोटी आली आहे. त्यामुळे ही कविता अधिक वास्तव आणि प्रखर बनली आहे, हे विसरता येणार नाही.'' लेखकाने भाषेविषयी केलेले विवेचन अनेक दृष्टींनी महत्त्वाचे आहे. अभ्यासकांना मार्गदर्शक ठरणार आहे.

'वसत कानेटकरांचे नाट्यवैभव' हा डॉ. संजय लांडगे यांचा दुसरा समीक्षा ग्रंथ तेवढ्याच तोलामोलाचा आहे. लहानपणापासून नाटकात काम करायची आवड. महाराष्ट्र राज्य नाट्यस्पर्धा, कामगार कल्याण मंडळाच्या नाट्यस्पर्धा अशा स्पर्धेतून अभिनयाची दिग्दर्शनाची अनेक पारितोषिके मिळवली आहेत, असे मनोगतातच लेखकाने सांगितले आहे. 'वांझ क्रांती आणि तीन एकांकिका' ह्या पुस्तकाला प्रसिद्ध समीक्षक भालचंद्र फडके याची प्रस्तावना लाभली आहे. यावरून नाटक या वाङ्मय प्रकाराविषयी लेखकाची अभिरूची लक्षात येते. त्यांच्या या अभिरूचीतून 'वसंत कानेटकरांचे नाट्यवैभव' या समीक्षाग्रंथाची निर्मिती झाली आहे. एकूण पाच प्रकरणात या ग्रंथाची विभागणी करण्यात आली आहे. पहिल्या प्रकरणांत वसंत कानेटकर यांचे जीवनचरित्र आणि व्यक्तिमत्त्वाची जडणघडण; दुसऱ्या प्रकरणात वसंत कानेटकरांच्या नाटकांतील कथानकांची वैशिष्ट्ये; तर तिसऱ्या प्रकरणात कानेटकरांच्या नाटाकतील पात्रसृष्टी सांगितली आहे. चौथ्या प्रकरणात वसंत कानेटकरांच्या नाट्यातील अभिव्यक्तीची वैशिष्ट्ये सविस्तर सांगितली आहेत. शेवटच्या प्रकरणात समारोप करून काही निष्कर्ष काढले आहेत.

वसंत कानेटकरांचे जीवनचरित्र पाहात असताना कानेटकरपूर्व मराठी नाट्य वाङ्मयाची लेखकाने परंपरा सांगितली आहे. लोककलांच्या माध्यमातून लोकरंगभूमीद्वारे लोकरंजन सुरू होते. संत तुकारामांच्या अभंगात ही नाटकाचा उल्लेख आला आहे. शिवाय भारतातील अतिप्राचीन आर्यपूर्व संस्कृती म्हणून यक्ष संस्कृतीचा उल्लेख केला जातो. त्या संस्कृतीतही नृत्याचा उल्लेख आढळतो. यक्षगानाचे थोर जाणकार साहित्यीक डॉ. शिवराम कारंत यज्ञगान निर्मितीचा शोध घेताना नागमंडल नृत्याचा उल्लेख करतात. अशा अनेक पुराव्यांनिशी पूर्वीपासून मराठी भूमीत नाटकाची रूजलेली वाटचाल ते स्पष्ट करतात.

१९५७ मध्ये 'वेड्याचं घर उन्हात' या नाटकापासून 'तू तर चाफेकळी' या शेवटच्या नाटकापर्यंत याही अगोदर म्हणजे १९४० साली विद्यार्थी दशेतच त्यांचा कथालेखनास झालेला प्रारंभ, त्यानंतर तीन कादंबऱ्यांचे झालेले लेखन, या कादंबरीच्या लेखनातूनच पुढे नाटक लेखनाचा प्रारंभ, त्यातच चित्रपटासाठी दोन कथा, 'अश्रूंची झाले फुले' हा अशोक कुमारने केलेला सिनेमा ('आँसू बन गये फुल) या सिनेमासाठी १९७१ साली उत्तम पटकथेचे मिळालेले फिल्मफेअर अवॉर्ड. कानेटकर म्हणतात, सिनेमा नावाच्या त्या अवाढव्य पसाऱ्यातील कथालेखक म्हणजे मशिनमधला फक्त एक स्क्रू ही भूमिका मनी घेऊन पुन्हा नाट्यलेखन 'मी माझ्याशी' हे आत्मचरित्र; तर कवी गिरीशची 'आम्बराई' या निवडक कवितेचे संपादन, 'नाटक एक चिंतन' या महत्त्वपूर्ण ग्रंथाची निर्मिती, त्यांना मिळालेले मानसन्मान इत्यादी सविस्तर माहिती लेखकाने दिली आहे. कानेटकरांच्या नाटकातील कथानकांची वैशिष्ट्ये सांगताना लेखक म्हणतात. 'एकाच वेळी शोकात्मिका आणि सुखात्मिका समर्थपणे लिहिणारे कानेटकर हे मराठीतील एकमेव नाटककार असतील असे म्हटल्यास ते अतिशयोक्तीचे ठरू नये कारण काही नाटककार शोकात्मिक नाटके लिहितात; तर काही नाटककार सुखात्मिक नाटके लिहितात. परंतु कानेटकरांनी दोन्हीप्रकारची नाटके समर्थपणे लिहिली आहेत. अर्थात त्यामध्ये सुखात्मिक नाटकांपेक्षा शोकात्मिक नाटकेच

अधिक आहेत. याचाच अर्थ असा की, कानेटकर हे जीवनाचा गंभीर आणि विनोदी पातळीवरून वेध घेतात. नाटक गंभीर असो किंवा विनोदी; पण ते रसिकमनाचा परिणामकारकरीत्या वेध घेते. याचे मुख्य कारण म्हणजे त्यांचे कथानक कौशल्य होय. कथानकाविषयी लेखकाचे विवेचन खूपच महत्त्वाचे आहे. 'मत्स्यगंधा'–संगीतमय पौराणिक नाटक, 'अश्रूंची झाली फुले'–सामाजिक नाटक, 'गगनभेदी', 'वेड्याचे घर उन्हात', 'प्रेमा तुझा रंग कसा' अशा नाटकांसंदर्भात लेखकाने केलेले भाष्य खूपच काही सांगून जाते. 'रायगडला जेव्हा जाग येते' या नाटकासंदर्भात लेखक म्हणतात, या नाटकातील प्रत्येक घटनेतील नाट्य पुरेपूर वसूल आणि परिणामकारक करण्याच्या प्रयत्नातही कानेटकर यशस्वी ठरले. शिवाजी, राजाराम, येसूबाई या व्यक्तिरेखा यशस्वी झाल्या आहेत. कर्तबगार माणूस उतारवयात आल्यानंतर त्याच्यात जे फेरफार होतात. ते कानेटकरांनी उतार वयातल्या शिवाजीत चांगले दाखविले आहेत. ते सांगत असतानाच माणसाच्या मनात शिरून त्याच्या अंतरंगाचा शोध घेणे हा कानेटकरी नाट्यप्रतिभेचा छंद आहे. अखंडपणे असा शोध घेणे हे कानेटकरी नाटकाचे सूत्र आहे. ह्या निष्कर्षापर्यंत लेखक पोहोचते. कथानकातील नाट्यमयता, नाट्यवाङ्मयातील संघर्ष, कथारचनेची वैशिष्ट्ये कानेटकरांच्या नाटकातील असे अनेक घटक केंद्रस्थानी ठेवून त्यांनी अभ्यास केला आहे; तर व्यक्तिदर्शनातील सामर्थ्य, स्वभाव दर्शनातील सौंदर्य, आदर्शवादी आणि वास्तवादी पात्रे, त्या पात्रांच्या माध्यमातून त्यांचा माणूस शोधण्याचा प्रयत्न, दैवी पात्राचे मानवी दर्शन कसे घडते, मनोविश्लेषाचा वापर कसा केला आहे, या नाटकांत शूर, पराक्रमी, कर्तबगार, धाडसी, चतुर, बुद्धिमान, धूर्त, मुत्सद्दीगीर, सावध, जागृत अशा गुणवैशिष्ट्यांनी शिवाजीचे व्यक्तिमत्त्व बांधले आहे. तर एक अपयशी पिता स्वराज्याच्या विकासाचे शल्य मनात घेऊन जगणारा बाप अशा रूपातून शिवाजीची व्यक्तिरेखा कशी साकार झाली आहे, हे ते अभ्यासाअंती स्पष्ट करतात.

मत्स्यगंधा या नाटकातील सत्यवतीची विविध रूपे कानेटकरांनी कशी रेखाटलेली आहेत? प्रेयसी, पत्नी, सम्राज्ञी, राजमाता, सासू अशा भूमिकेतून तिच्या व्यक्तिमत्त्वाचा कोणता पैलू दाखविला आहे ते तपशीलाने सांगतात. ते म्हणतात, ''प्रत्येक भूमिकेत तिच्या वाट्याला वंचना, दुःख, अपेक्षाभंग आल्याने तिचे व्यक्तिमत्व शोकात्मक बनले आहे. आरंभीच्या नाटकातील सुंदर, बुद्धिमान, खेळकर, आनंदी सत्यवती ही शोकनाटयाची नायिकाच आहे. कानेटकरांनी अभ्यासपूर्ण चिंतनातून आणि जीवनातील सूक्ष्म निरीक्षणातून सत्यवती या व्यक्तिरेखेचे स्वभाव चित्रण रेखाटले आहे.'' लेखकाने हे असे एक सूत्ररूपात सांगितले आहे.

नाटकातील स्वगते, गीत, कविता, भाषासौंदर्य, पौराणिक, ऐतिहासिक अशी भाषा आणि 'शिवबा पंखात पुरतं बळ नसताना गरूडासारखी आकाशाला मिठी मारायला तू झेप घेतलीस' अशी काव्यमय भाषा; तर 'माणसं इमान सोडतात, विश्वासघात करतात तेव्हा आम्हालाही मुठीतून वाघनखं काढावी लागतात' असे संवाद अशी अनेक उदाहरणे देऊन लेखकाने कानेटकरांच्या नाटकातील भाषिक सौंदर्य उलगडून दाखिवले आहे. लहानपणापासूनच लेखकाला असणारे नाटकाविषयीचे आकर्षण, त्यांनी नाटकाविषय जोपासलेला व्यासंग, अभ्यास आणि सातत्याने केलेले चिंतन यातूनच या समीक्षाग्रंथाची निर्मिती झाली आहे. त्यामुळे त्याला एक वेगळे मूल्य प्राप्त झाले आहे.

## संदर्भ

1.ग्रामीण साहित्य प्रवाह आणि परिस्थिती वामन जाधव स्नेह वर्धन प्रकाशन, पुणे.
2.महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणेचा इतिहास संजय लांडगे, दिलीपराज प्रकाशन, पुणे.